संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# आर्थिक अहवालातील निराशाजनक चित्र

**राज्याचे** एकूणच आर्थिक धोरण कर्जबाजारीपणा आणि अनुत्पादक खर्चाच्या चिखलामध्ये आणखीनच रुतत चालल्याचे दिसून येते. अर्थसंकल्पापूर्वी जाहीर झालेल्या राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये कोणत्याच आघाडीवर सरकारने समाधानकारक यश मिळवलेले दिसत नाही. अगदी गेल्या वर्षी मोठा गाजावाजा करून झालेला 'मेक इन इंडिया'चा कार्यक्रमसुध्दा पाहिजे तशी प्रगती दाखवू शकलेला नाही. राज्यात कृषी उद्योग महत्त्वाचा मानला जातो. गेल्या वर्षात कृषी उत्पादनात वाढ झाल्याचे एकमेव सकारात्मक चित्र सोडले तर औद्योगिक उत्पन्नामध्ये वाढ झाली नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यानंतरच्या अर्थसंकल्पात कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन, अन्य भत्ते याच्यावर सर्वाधिक तरतूद झाल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाल्याचे दिसून येते. विकासकामांसाठी जी तरतूद झाली आहे, तीदेखील पुरेशा स्वरूपाची नाही. कारण मुळातच गेल्या दोन वर्षांचा अनुभव घेतल्याबरोबर विकास कामांच्या गतीमध्ये समाधानकारक वाढ झालेली नाही. केंद्र सरकारचा काही निधी आणि राज्य सरकारचा वाटा यामधून आवश्यक त्या कामांना निधी देण्याचे धोरण सरकारने अवलंबलेले दिसते. यातला महत्त्वाचा फरक असा आहे की, ज्या प्रकल्पांसाठी निधीची तरतूद केली गेली आहे, ती प्रकल्प खर्चापेक्षा किमान २५ टक्के जास्त असल्याचे अर्थतज्ज्ञांचे म्हणणे आहे. जर राज्यातील प्रशासकीय कारभार पारदर्शक स्वरूपाचा असेल तर राज्य सरकारच्या सगळ्या प्रकल्पांच्या खर्चात उलट किमान दहा टक्के कपात अपेक्षित आहे. तसे न होता, प्रकल्प खर्चातली ही वाढ सरकारी कामांमधला भ्रष्टाचार तसाच कायम आहे, यावर शिक्कामोर्तब करणारे ठरते. आज महाराष्ट्राला प्रामुख्याने चार मूलभूत गोष्टींची आवश्यकता आहे. एक म्हणजे जलसिंचन, रस्ते, आरोग्य आणि शिक्षण. या चारही आघाड्यांवर फारशी प्रगती झालेली दिसून येत नाही. राज्यातला दुष्काळ आणि शेतीला अधिकतर पाणी उपलब्ध करून देण्याकरिता भाजपा सरकारने सत्तेवर येताना फार मोठ्या वल्गना केल्या होत्या. जलसिंचन प्रकल्पात झालेला भ्रष्टाचार उखडून फेकू, त्यातल्या दोषी लोकांवर कारवाई करू आणि कमीत कमी खर्चात राज्याची सिंचन क्षमता वाढवू, असे चित्र रंगवले गेले होते. पण गेल्या दोन वर्षांत जलयुक्त शिवार हा एकमेव नवा उपक्रम वगळता कोणत्याच जलसिंचन प्रकल्पाची समाधानकारक प्रगती झालेली नाही. पुढच्या दोन वर्षांत राज्यात एखादे तरी नवीन धरण बांधून होईल की नाही, याबद्दल कोणीच खात्री देऊ शकत नाही. तीच परिस्थिती अन्य क्षेत्रांबाबतही आहे.

## मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष

सरकारच्या एकूण कामकाजाचा प्राधान्यक्रम बघितला तर तो मतांच्या राजकारणाशीच जास्त निगडित असल्याचे दिसून येते. जसे नागपूर महापालिकेतील सत्ता हवी असेल तर मेट्रोला प्राधान्य दिले गेले. नागपूरात मेट्रोचे काम धूमधडाक्यात सुरू आहे. आता मुंबई-पुण्यातही मेट्रो रेल्वे आणि काही उड्डाणपूल यांच्या कामाला प्राधान्य दिले जात आहे. कारण इथल्या महापालिका सत्ताधारी पक्षाच्या ताब्यात आल्या आहेत. पुणे, औरंगाबाद, नाशिक किंवा अगदी मुंबईजवळच्या डोंबिवली, कल्याण भागातसुध्दा रस्त्यांच्या विकासाला महत्त्व मिळते आहे. परंतु, मुंबई वगळता सर्व महापालिका हद्दीत पिण्याच्या पाण्याची टंचाई, सरकारी किंवा महापालिकांच्या दवाखान्यांमधील दुर्दशा आणि शिक्षणाच्या व्यवस्थेतली अबाळ या सगळ्या गोष्टी तशाच कायम असल्याचे पाहायला मिळते. पुण्यासारख्या सांस्कृतिक महानगरीत अनधिकृत बांधकाम हा विषय तर नेहमीच राजकीय आखाड्याचा मानला गेला. संपूर्ण राज्यभर हा विषय मते मिळवण्यासाठी उपयोगी पडणार असल्यामुळे अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला गेला. न्यायालयाने त्याला आता स्थगिती देऊन सणसणीत चपराक हाणलेली आहे. ज्या मूलभूत गोष्टी पुढच्या वीस-पंचवीस वर्षांचा विचार करून करणे गरजेचे आहे. त्याबाबत विशेष काहीही घडताना दिसत नाही. ग्रामीण भागात रोजगाराचा विचार होत नाही. औद्योगिक धोरणातून ग्रामीण भागाला विकासाची संधी मिळावी, अशी कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. आर्थिक पाहणीतल्या आकडेवारीनुसार राज्याच्या उद्योग वाढीमध्ये कोणतीही मोठी भर पडलेली नाही. अगदी या उद्योगांसाठी 'ईज ऑफ डूइंग बिझीनेस' नावाची तबकडी वारंवार वाजवली जाते. म्हणजे उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या तातडीने देण्याचे आदेश दिले गेले. परंतु, त्याचा प्रत्यक्ष परिणाम मात्र दिसून आलेला नाही. ज्या मुंबईत 'मेक इन इंडिया'चा कोट्यवधी रुपये खर्चून कार्यक्रम झाला, त्या मुंबईतसुध्दा एकही नवी स्टार्टअपची योजना आकाराला आलेली नाही. याच्याइतकी दुसरी शोकांतिका नाही.

## कर्जमाफीही नाही, फी माफीही नाही

एकीकडे पैशाची कसरत सुरू असताना नको त्या योजनांवर पैशाचा पाऊस पाडला जात आहे. कर्जमाफीसाठी विरोधक आणि सत्ताधारी दोघेही राजकारण करीत आहेत. सरकारला कर्जमाफीपेक्षा कर्जमुक्तीची योजना राबवायची आहे. ती राबवण्याकरिता गावागावात शेतकऱ्याशी संवाद साधून त्याला प्रोत्साहन देण्याची कोणतीही कल्पना सरकारकडे नाही. फक्त जाहिरातींच्या माध्यमातून शाश्वत शेतीचे आवाहन केले जात आहे. शेती क्षेत्रातील उत्पन्नात वाढ झाली, हे याचे महत्त्वाचे कारण म्हणजे महाराष्ट्रात उत्तम पर्जन्यमान झाले. त्यातून ही कृषी उत्पादनातली वाढ दिसून येते. परंतु दुसरीकडे विद्यार्थ्यांसाठी घोषित झालेली फी माफीची योजना अजून आकाराला आलेली दिसत नाही. विशिष्ट उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना गेल्या वर्षभरात भरलेली फी परत मिळेल, असे आश्वासन दिले गेले. मराठा मोर्चातून निघणारा राग शांत करण्याकरिता ही फी माफीची शक्कल लढवली गेली, पण अजूनही विद्यार्थ्यांच्या हातात फी माफीची रक्कम पडलेली नाही. म्हणजे कर्जमाफी नाही आणि फी माफीही नाही. अशा परिस्थितीत राजकीय पाहुण्यांच्या खर्चासाठी मात्र आलिशान गाड्यांकरिता कोट्यवधी रुपयांची उधळण केली जात आहे. आर्थिक स्तरावरचे चित्र पूर्णपणे निराशाजनक असल्याचे राज्याच्याच आर्थिक अहवालाचे म्हणणे आहे.